# दुरस्त शिक्षण प्रणालीद्वारे उच्च शिक्षण उपलब्ध करून देणारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक: एक दृष्टीक्षेप

**मंगेश वागदे**
ग्रंथपाल / केंद्र संयोजक
गोपिकाबाई भुरे महिला महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा
Email Id : dostmangesh@gmail.com

---

*सारांश:*

*"प्रस्तुत लेखामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक यांची स्थापना झाल्यापासून तर आज पर्यंत विद्यापीठाने समाजातील लोकांकरिता दुरस्त शिक्षण प्रणालीद्वारे शिक्षणाच्या कशा संधी उपलब्ध करून दिलेले आहेत, मुक्त विद्यापीठाचे उद्दिष्टे, वैशिष्ट्ये, संस्थेची रचना, विद्याशाखा व विभाग, उपलब्ध शिक्षणक्रम, कार्यक्षेत्र, बोधचिन्ह, अभिनव उपक्रम याबद्दल सविस्तर अशी माहिती दिलेली आहे.*

**संज्ञा**: दुरस्त शिक्षण प्रणाली, उच्च शिक्षण, मुक्त विद्यापीठ, डिजिटल विद्यापीठ

---

**प्रस्तावना:**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ देशातील सर्व मान्यता मान्यताप्राप्त विद्यापीठाशी समकक्ष आहे. महाराष्ट्र शासन व शासनाच्या मान्यताप्राप्त असलेल्या सर्व सरकारी, निमसरकारी, खाजगी संस्था, विविध मंडळे इत्यादी मधील नोकऱ्यांसाठी, नोकरीत बढती मिळवण्याकरिता तसेच पुढील शिक्षणासाठी या विद्यापीठाच्या पदव्या इतर विद्यापीठाच्या पदव्याप्रमाणेच समकक्ष आहे. विद्यापीठाचे अनेक विद्यार्थी केंद्रीय तथा राज्य लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत.

राष्ट्राच्या व राज्याच्या विकास आराखड्याशी समन्वय साधून, आपल्या विकासाविषयी गरजा अनुरूप विविध शिक्षणक्रम उपलब्ध करून देणे हे मुक्त विद्यापीठाचे ध्येय आहे. तसेच बदलते तंत्रज्ञान व त्या अनुषंगाने बदलणाऱ्या जीवन प्रणालीशी समायोजन साधण्याकरिता समाजाला ज्ञानात्मक आधार पुरवणे, शिक्षणक्रम विकसित करण्यावर मुक्त शिक्षण पद्धतीचा भर आहे. त्यामुळे आयुष्यभरासाठी शिक्षण, काम करता करता शिक्षण, नोकरी व्यवसायाला आधारभूत ठरणारे कौशल्यधिष्ठित शिक्षण या संकल्पना प्रत्यक्षात आणून अध्ययनशील समाजाच्या जडणघडणीत विद्यापीठ सहभागी आहे.[2]

**मुक्त विद्यापीठाची संकल्पना:**

मुक्त विद्यापीठ ही संकल्पना नवीन असून जगभरात तिचा सर्वत्र स्वीकार झालेला आहे. विविध कारणामुळे अनेकांना शिक्षण अर्धवट सोडावे लागते. ग्रामीण भागांना शैक्षणिक सुविधाचा अभाव असल्यामुळे, तसेच नोकरी व्यवसायामुळे पुढील शिक्षण घेण्याची इच्छा असूनही ज्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. त्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या ध्येयाने मुक्त विद्यापीठे कार्यरत झालेली आहेत. सन 1969 मध्ये जगातले पहिले मुक्त विद्यापीठ इंग्लंडमध्ये स्थापन झाले. त्या पाठोपाठ चीन, जपान, थायलंड, श्रीलंका, पाकिस्तान, बांगलादेश अशा अनेक देशांमध्ये मुक्त विद्यापीठ मुक्त विद्यापीठे स्थापन झाली असून विविध शिक्षण क्रमाच्या संधी



Research Hub International Journal

समाजातील इच्छुकांना दिली जात आहे.

भारतात 1982 मध्ये हैदराबाद येथे पहिले मुक्त विद्यापीठ स्थापन झाले. सन 1985 मध्ये केंद्र सरकारने राष्ट्रीय पातळीवर इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ दिल्ली येथे स्थापन केले. त्यानंतर राजस्थान, बिहार, महाराष्ट्र मध्यप्रदेश, गुजरात, कर्नाटक, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, तामिळनाडू, छत्तीसगड, आसाम, उत्तराखंड, ओडिसा, पंजाब, केरळ या राज्यात मुक्त विद्यापीठे कार्यरत झालेली आहेत. [2]

**विद्यापीठाची स्थापना:**

शैक्षणिक विकास आणि पुनर्रचनेचा महाराष्ट्राला फोर मोठा वारसा आहे. महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, स्वामी रामानंद तीर्थ यांच्यासारख्या थोर विचारवंतांचे या राज्यातील शैक्षणिक विकासाच्या चळवळीत मोठे योगदान आहे. याच परंपरेला अनुसरून महाराष्ट्र शासनाच्या विधीमंडळाने १ जुलै १९८९ रोजी विशेष कायदा क्रमांक २० अन्वये या विद्यापीठाची स्थापना करून त्यास महाराष्ट्राचे थोर नेते व आधुनिक महाराष्ट्राचे जनक यशवंतराव चव्हाण यांचे नाव दिले. कायदा क्रमांक २०(१९८९) ने प्राप्त करून दिलेल्या वैधानिक दर्जामुळे आणि विद्यापीठ अनुदान आयोगाने कलम १२, यु.जी.सी. ॲक्ट, १९५६ अन्वये मान्यता दिल्यामुळे या विद्यापीठास विविध प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर आणि संशोधक अशा पातळीवरील शिक्षणक्रम उपलब्ध करून देणे शक्य झाले आहे.

**मुक्त विद्यापीठाचे उद्दिष्टे:**

- समाजातल्या शेवटच्या स्तरापर्यंत ज्ञानगंगा पोचवून तसेच शहरी, ग्रामीण व मागास भागातील कष्टकरी, गृहिणी व अन्य प्रौढांना त्यांच्या गरजा लक्षात घेऊन सर्वसाधारण पदवी शिक्षण, व्यावसायिक, तांत्रिक व इतर शिक्षण प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे. म्हणजेच समाजातील विविध स्तरांमधील ज्ञानात्मक विषमता दूर करण्याचे माध्यम म्हणून कार्य करणे.
- वय, कालावधी व प्रवेश पात्रतेच्या नियमाचे जोखड दूर करून शिक्षणाची इच्छा असणाऱ्या सर्वांना सहजपणे शिक्षण घेता येईल अशी लवचिक व उपक्रमशील मुक्त शिक्षण पद्धती विकसित करणे.
- पारंपारिक विद्यापीठातील शिक्षण अपूर्ण राहिलेल्या व्यक्तींना त्याची पूर्ण केलेल्या शैक्षणिक भागाचे मूल्य विचारात घेऊन मुक्त विद्यापीठाच्या उपलब्ध शिक्षणक्रमात व पुढील शिक्षणक्रमाच्या वाटा मोकळ्या करणे.
- अनौपचारिक व निरंतर शिक्षणामार्फत तसेच शैक्षणिक विस्तार सेवांच्या उपक्रमातून विविध कला कौशल्यांचा विकास करण्याकरिता गुणात्मक शिक्षण उपलब्ध करून देणे.
- बदलत्या तंत्रज्ञानाशी समायोजित होण्यासाठी प्रौढांना नव्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे.
- भारताच्या आणि विशेषता महाराष्ट्राच्या कला परंपरा, सांस्कृतिक संचित आणि सामाजिक प्रबोधनाचा वारसा याचे जतन व संवर्धन करण्याकरिता तसेच राष्ट्रीय एकात्मता व व्यक्तिमत्त्वाचा एकत्र विकास साधण्याकरिता विविध शिक्षणक्रम विकसित करणे.
- केवळ शासकीय अनुदानावर अवलंबून न राहता आपल्या प्रशासकीय खर्चाच्या बाबतीत स्वावलंबी होण्यावर भर देऊन त्याकरिता खाजगी व सामाजिक संस्थांचा वित्तीय सहभाग मिळवणे तसेच संगणक,

Impact Factor
5.307 (SJIF)

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal


ISSN
2582-9173

आधुनिक उपकरणांचा प्रभावी उपयोग करून किफायतशीर व गुणवत्ताधिनिष्ठ कार्यप्रणाली विकसित करणे.[2]


**मुक्त विद्यापीठाचे वैशिष्ट्ये :**

- रोजगाराभिमुख व तांत्रिक कौशल्यावर भर
- अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर
- सुलभ प्रवेश, शिक्षणक्रमांच्या निवडीचे स्वातंत्र्य, श्रेयांकांतर लाभ
- सर्वदूर अभ्यास केंद्रांची सहज उपलब्धता
- मूल्यमापनाची शास्त्रशुद्ध पद्धत
- दर्जेदार शिक्षणावर विशेष भर
- अनुभवपूर्ण सखोल संशोधनावर निष्ठा
- अन्य विद्यापीठात व व्यावसायिक संस्थांत या विद्यापीठाच्या शिक्षणाला समकक्षता
- जागतिक संस्थांशी संधान

**मुक्त विद्यापीठाचा होमपेज: (https://ycmou.digitaluniversity.ac/)**




**संस्थेची रचना:**




**विद्यापीठाच्या विद्याशाखा व विभाग:**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ मध्ये विविध विद्याशाखा आणि विभागाची निर्मिती करण्यात आलेली आहे. विविध शाखांद्वारे विद्यार्थ्यांना त्या त्या अभ्यासक्रमाची माहिती मिळण्याकरिता विद्याशाखा तयार करण्यात आलेल्या आहेत. 21व्या शतकातील जागतिक आव्हानांना सामोर जाण्यासाठी बौद्धिक पूर्वतयारी करणे आणि अध्ययनशील समाजासाठी शैक्षणिक संसाधनाचा विकास करणे हे या विद्याशाखेचे ध्येय आहे. विद्याशाखेतील विविध शिक्षणक्रमाचा आशय हा मानव केंद्रित असतो. मानवी मूल्यावर व माणसाच्या विकास कार्यक्रमावर भर देणारा असे हे या विद्याशाखेतील अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य आहे.

- मानव्यविद्या व सामाजिक शास्त्र विद्याशाखा
- वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखा
- कृषी विज्ञान विद्याशाखा
- शिक्षणशास्त्र विद्याशाखा
- संगणकशास्त्र विद्याशाखा
- निरंतर शिक्षण विद्याशाखा
- विज्ञान विद्याशाखा
- आरोग्य विज्ञान विद्याशाखा

- संयोग आणि विशेष उपक्रम केंद्र
- शैक्षणिक सेवा विभाग

**विद्यापीठाच्या विद्या शाखेची उद्दिष्टे:**

- विद्यार्थी केंद्रित शिक्षणक्रम विकसित करणे
- मुक्त शिक्षण प्रणालीनुसार लवचिक अध्ययन व अध्यापन पद्धतीचा अवलंब करणे
- समाजातील अद्याप शिक्षण पोहोचले नाही अशा दुर्लक्षित घटकापर्यंत शिक्षण पोहोचवणे
- अध्ययनार्थीला विद्याशाखेतील शिक्षणास प्रोत्साहित करणे
- नवज्ञानाआधारित समाजनिर्मिती करणे.
- दूरशिक्षणाद्वारे जनसामान्यापर्यंत पोहोचून लोक विद्यापीठ घडविणे.

**मुक्त विद्यापीठांमध्ये उपलब्ध शिक्षणक्रम:**

- प्रमाणपत्र शिक्षण: एकूण अभ्यासक्रम 28
- पदविका शिक्षणक्रम: एकूण अभ्यासक्रम 40
- पदवी शिक्षणक्रम: एकूण अभ्यासक्रम 16
- पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम: एकूण अभ्यासक्रम 23
- आचार्य पदवी शिक्षणक्रम (पीएच,डी)

**विद्यापीठाचे कार्यक्षेत्र:**

विद्यापीठाचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य आहे. विद्यापीठाचे मुख्यालय नाशिक येथे आहे. विद्यापीठाचे कार्य ८ विभागीय केंद्रांमार्फत चालते. अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, मुंबई, नाशिक, नांदेड, नागपूर आणि पुणे ही ती विभागीय केंद्रे होत.

**विद्यापीठ बोधचिन्ह:**

बोधचिन्हाचा मध्य भाग मोराचे प्रतीक आहे, सरस्वतीचे वाहन, ज्ञान आणि बुद्धीची देवी. बाहेरून पसरणारे गोलाकार स्ट्रोक मोकळेपणा, गतिशीलता आणि प्रसार दर्शवतात. YCMOU चिन्ह अशा प्रकारे ज्ञानाचा प्रसार, दूरवर आणि व्यापकपणे दर्शवते, जे विद्यापीठाचे ब्रीदवाक्य आहे. शब्दशः अनुवादित, "ज्ञानगंगा घरोघरी" या बोधवाक्याचा अर्थ आहे: 'प्रत्येक घरात ज्ञानाची नदी'. व्यवहारात, बोधवाक्य या विद्यापीठाचे उद्दिष्ट प्रतिबिंबित करते: ज्ञानाचा प्रवाह सामान्य माणसाच्या घरापर्यंत पोहोचवणे. [1]

ज्ञानगंगा घरोघरी

**अभिनव उपक्रम:**

1. **उपग्रहाव्दारे शिक्षण :** इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (इस्रो) यांच्या सहकार्याने एज्यु सॅट या उपग्रहामार्फत शिक्षण देण्याचा हा उपक्रम तंत्रज्ञानाचा शिक्षणामध्ये वापर करण्याचा एक आदर्श ठरेल. या विद्यापीठाने राज्यभर अनेक आभासी शिक्षण केंद्रे सुरु केले आहेत. त्या प्रत्येक केंद्रावर दोन्ही बाजूने संवाद साधण्याची दृक्श्राव्य उपकरणे आहेत. विशिष्ट शिक्षणक्रमासाठी नोंदणी केलेले विद्यार्थी तेथे ठराविक वेसेस उपस्थित राहतात. तज्ञ शिक्षक विद्यापीठाच्या मुख्यालयातील आठवा पुणे येथील स्टुडीओतून मार्गदर्शन करतात. ठीकठिकाणचे विद्यार्थी यात सहभागी होतात. लवकरच या तंत्राचा मोठ्या प्रमाणावर सर्व शिक्षणक्रमांसाठी केला जाणार आहे.
2. **व्हिडिओ ऑन डिमांड:** स्पर्धा परीक्षांसाठी राबविलेल्या विशेष उपक्रमात प्रत्येकी २ तासांचे ३० व्हिडिओ कार्यक्रम वेबसाईट मार्फत विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याचा प्रयोग करण्यात आला. अभ्यास केंद्रांनीही विद्यार्थ्यांना एकत्र बोलावून हे कार्यक्रम पाहण्याची सुविधा उप्लाभ्द करून दिली होती. मागणी करताच हवा त्या विषयाचा कार्यक्रम पाहता यावा हा त्याचा उद्देश. लवकरच हा उपक्रम सर्व शिक्षणक्रमांसाठी राबविण्यात येणार आहे.
3. **पर्यावरण जागृती कार्यक्रम:** ५ जून – जागतिक पर्यावरण दिन , या निमित्ताने विद्यापीठाने एक उपक्रम हाती घेतला. विद्यापीठाच्या 'ओपन सोर्स' व्दारे पर्यावरणाच्या रक्षणासाठी माहिती देणारे ३० व्हिडिओ कार्यक्रम उपलब्ध करून देण्यात आले. तसेच ह्या कार्यक्रमाचे संच महत्वाच्या ठिकाणी वाटप करण्यात आले. पद्मश्री सुंदरलाल बहुगुणा, डॉ. माधव चितळे, डॉ. आनंद कर्वे यांचा त्यात सहभाग आहे. शालेय स्तरावर पर्यावरण शिक्षण देण्याबाबत मा. सर्वोच्च न्यालयाने दिलेल्या निर्देशाच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम महत्वाचा आहे.
4. **मोबाईल लर्निंग सेंटर:** तळागाळातील लोकांपर्यंत ज्ञानगंगा पोचविण्याचे धोरण असलेल्या या विद्यापीठाने मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून दूरवरच्या पाड्यांवर संगणकाचे शिक्षण देण्याचा आगळा वेगळा उपक्रम हाती घेतला. या व्हॅनमध्ये ६ संगणक असून एका वेळी १२ विद्यार्थी बसण्याची सोय आहे. यातील प्रोजेक्टर चा वापर करून एका वेळी ५० विद्यार्थ्यांना शिक्षण देणे शक्य झाले आहे. नाशिक जवळील ननाशी नावाच्या छोट्याशा गावातील ५० विद्यार्थ्यांनी नोंदणी करून या उपक्रमाचा श्रीगणेशा केला.
5. **कृषी विज्ञान केंद्र:** भारतीय कृषी संशोधन परिषद (आय.सी.ए.आर.) यांनी १९९४ मध्ये या विद्यापीठात कृषी विज्ञान केंद्राची स्थापना केली. कृषी क्षेत्रातील हा एक नाविन्यपूर्ण उपक्रम असून त्या व्दारे शेतकरी व कृषी उद्योजकांना मार्गदर्शन केले जाते. तळागाळातील शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेनुसार प्रशिक्षण देऊन ग्राम विकास साधण्याचा हा प्रकल्प आहे. शास्त्र शुद्ध मार्गदर्शनासाठी कृषी विज्ञान केंद्राने एका 'आदर्श शेता'ची निर्मिती केली आहे. विद्यापीठ परिसरातील या कृषी विज्ञान केंद्राच्या प्रशासकीय इमारतीत माती व पाणी परीक्षण प्रयोग शाळा, फायटो डायग्नोस्टिक्स, पोस्ट हार्वेस्ट टेक. प्रयोगशाळा आणि कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्र आहे. ३० शेतकऱ्यांची निवास व्यवस्था या ठिकाणी आहे. या केंद्रात अत्याधुनिक शेतीचे प्रशिक्षण देण्या बरोबरच कीड नियंत्रण, रोग नियंत्रण याचेही प्रशिक्षण दिले जाते. गांडूळखत तयार करण्याचे प्रशिक्षणही दिले जाते. बहुसंख्य शेतकऱ्यांच्या सहभागाने ग्राम दत्तक योजनेव्दारे मोठ्या प्रमाणावर आधुनिक शेतीचे प्रशिक्षण दिले जाते.

6. **दाई प्रशिक्षण कार्यक्रम:** आरोग्य शिक्षण उपक्रमांतर्गत दाई प्रशिक्षण हा एक अभिनव उपक्रम विद्यापीठाने हाती घेतला आहे. पुरेसा विकास झालेला नसल्याने भारतातील निम्मी बाळंतपणे घरीच होतात. विशेषतः आदिवासी व अति दुर्गम भागात हे प्रमाण आधी आहे. त्या ठिकाणी सुरक्षित बाळंतपणे करण्यासाठी दाई प्रशिक्षण हा १० श्रेयान्कांचा शिक्षणक्रम विद्यापीठाने विकसित केलेला आहे.
7. **आरोग्य मित्र शिक्षणक्रम:** भारत सरकारच्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजने अंतर्गत ठीक ठिकाणी स्थापन झालेल्या 'आशा' प्रशिक्षणासाठी या विद्यापीठाने आरोग्य मित्र हा १६ श्रेयान्कांचा शिक्षणक्रम विकसित केला. [1]

**निष्कर्ष :**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ देशातील सर्व मान्यता मान्यताप्राप्त विद्यापीठाशी समकक्ष आहे. 'ज्ञानगंगा घरोघरी' विद्यापीठाचे ब्रीदवाक्य असून 'लोक विद्यापीठ' होण्याकडे वाटचाल करीत आहे. समाजाच्या तळागाळातील सर्वांपर्यंत गरजेनुसार शिक्षण पोहचविणे विद्यापीठाचे उद्दिष्टे आहे. मुख्यालय, विभागीय केंद्र, जिल्हा केंद्र, अभ्यास केंद्रे, कार्यस्थळ यांच्यामार्फत विद्यापीठाचे विविध शिक्षणक्रम ग्रामीण, शहरी आदिवासी, तसेच डोंगराळभागातील सर्वसामान्य पर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न केले जात आहे. मातृभाषेतून शिक्षण उपलब्ध करून देण्याचे या विद्यापीठाचे धोरण असून लोकभाषेला ज्ञानभाषेच्या दर्जा प्राप्त करून दिला पाहिजे या यशवंतराव चव्हाण यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाला अनुसरून हे विद्यापीठ काम करीत आहे.

**संदर्भसूची:**


- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक होमपेज https://ycmou.digitaluniversity.ac/ Viewed date 12/03/2024)
- वाडेकर नागार्जुन (2024) क्षेत्रीय प्रकल्प अभ्यासक्रम कार्यपुस्तिका. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ. पृष्ठ क्र. 4 ते 7.


Research Hub International Journal